**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/८६८४८८/२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक- २८/१०/२०२३

## ☆वाहतुक नियंत्रण अधिसुचना☆

सध्या एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धा २०२३ सुरु असुन दिनांक ३०/१०/२०२३ रोजी अफगाणीस्तान विरुद्ध श्रीलंका क्रिकेट सामना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीतील गहुंजे स्टेडीयमवर होणार आहे. सदर सामना पाहणेकरीता खाजगी वाहनांनी मोठ्या प्रमाणात प्रेक्षक येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

### देहुरोड वाहतूक विभाग

१) मुंबई कडून येणारी वाहने :

अ) उर्से टोलनाका- किवळे ब्रिज पुर्वी ५०० मी अंतरावरून डावीकडे वळून पुन्हा डावीकडे यु टर्न घेवून मामुर्डी अंडरपासचे उजव्या बाजूने कुणाल आयकॉन चौकाकडून पुढे दर्शविलेल्या पार्किंगकडे जातील.

ब) उर्से टोल नाका – किवळे ब्रिज उतरुन मुकाई चौक उजवे बाजूने किवळे ब्रिज खालून कृष्णा हॉटेल शेजारुन मामुर्डी अंडरपासचे डाव्या बाजूने अथवा एमएच ०४ बोगद्यातून डावीकडे वळून मामुर्डी अंडरपासचे उजव्या दिशेने कुणाल आयकॉन चौकाकडून पुढे दर्शविलेल्या पार्किंगकडे जातील.

क) सोमाटणे फाटा ते सेंट्रल चौक देहूरोड ते मामुर्डी-शितळादेवी अंडरपासकडे डावीकडे वळून यु टर्न घेवून अंडरपासने पुन्हा डावीकडे वळून लेखा फार्ममार्गे मामुर्डी अंडरपासचे उजव्या बाजूने कुणाल आयकॉन चौकाकडून पुढे दर्शविलेल्या पार्किंगकडे जातील.

ड) सेंट्रल चौक ते मुकाई चौकातून उजव्या बाजूने किवळे ब्रिज खालून कृष्णा हॉटेल शेजारुन मामुर्डी अंडरपासचे डाव्या बाजूने अथवा एमएच ०४ बोगद्यातून डावीकडे वळून मामुर्डी अंडर पासचे उजव्या दिशेने कुणाल आयकॉन चौकाकडून पुढे दर्शविलेल्या पार्किंगकडे जातील.

२. पुण्याकडून येणारी वाहने :

अ) किवळे ब्रिजचे पुर्वी डाव्या बाजूने सर्विस रोडवरुन कृष्णा हॉटेल शेजारुन मामुर्डी अंडरपासचे डाव्या बाजूने अथवा एमएच ०४ बोगद्यातून डावीकडे वळून मामुर्डी अंडरपासचे उजव्या दिशेने कुणाल आयकॉन चौकाकडून पुढे दर्शविलेल्या पार्किंगकडे जातील.

ब) पुणे बाजूकडुन येणारी वाहणे किवळे ब्रिज उतरल्यावर लगेच डावीकडे वळून मामुर्डी अंडरपासचे उजवे बाजूने कुणाल आयकॉन चौकाकडून पुढे दर्शविलेल्या पार्किंगकडे जातील.

३. सामना संपल्यानंतर कानेटकर बंगला ते साईनगर परिसरातील पार्किंगमधील वाहने साईनगर-सेंट्रल चौक मार्गाने इच्छितस्थळी जातील.

टिप :१) सेंट्रल चौक - साईनगर मार्गे कानेटकर बंगला चौककडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनास बंदी असेल.

Scanned with OKEN Scanner

२) मैदानाकडे प्रेक्षक येताना व सामना संपल्यावर परत जाताना त्याचे विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांना मज्जाव असेल.

तरी वरीलप्रमाणे दिनांक ३०/१०/२०२३ रोजी गहुंजे येथे होणाऱ्या अफगाणीस्तान विरुद्ध श्रीलंका एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट सामन्याचे अनुषंगाने आवश्यकतेनुसार वाहतूक मार्गात बदल करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी/वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

28/10/2023.

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी देहुरोड वाहतुक विभाग,

Scanned with OKEN Scanner